S.T. Educational Society & Co-Op. Educational Society Ltd's
Permanent Affiliated To S.N.D.T. Women's University, Mumbai

**Sr. Arts Mahila Mahavidyalaya,**
**Shahada, Dist - Nandurbar**
**(NAAC Reaccredited Grade – B CGPA 2.07)**
**Phone No. –** 02565-223532
**College Code**– 070
artsshahada070@gmail.com

**Dr. Kailas R. Chavhan**
(M.A., NET Ph.D.)
**Incharge Principal**

**Shri. M. F. Patil**
(M.Sc. Agri.)
**Chairman**

# Best Practices

## 2022-23

## Best Practice - 1

### 1. Title Of The Practice - Elocution Competition

### 2. Objectives of the practice –

- To convey any hurdles and problems regarding agriculture, education and development in North Maharashtra through this competition to respected Abhijit Dada.
- Through this competition the contestant can present his opinion to the youth leader. Various rhetoricians from all the three districts of North Maharashtra can share their thoughts on one platform.
- Thoughts of rhetoric lovers providing a forum for disclosure. Alleviating stage fright of contestants/students.

### 3. The Context –

North Maharashtra region of Maharashtra state is made up of three districts namely Nandurbar, Dhule and Jalgaon. In this region agriculture, development and There are various problems related to education. These questions should reach the people's representatives; so this year the competition was organized at North Maharashtra level.

### 4. The Practice -

Respected Dadasaheb Abhijit Patil, youth leader of Shahada area, was born on 1st October. His birthday was celebrated by our college with a "Grand Elocution Competition". It was the second year of the competition. We took this competition online. Students had registered for this competition and sent a video of their speech. After screening these online videos 08 contestants were invited for the offline competition. Examining this contest Expert Examiner Prof. Dr. Madhav Kadam and Prof. It was done by Khemraj Patil. Honorable Dadasaheb distributed prizes to five winners on 01st October. The three themes of the competition were 'Agriculture in North

Maharashtra: Yesterday, Today and Tomorrow', 'Amritmahotsav Year and Development of North Maharashtra' and 'Changing Educational Reality and North Maharashtra'.

## 5. Evidence of Success –

- After the problems of the common citizens reached the respected Dadasaheb, he made some efforts to solve the problems mainly in the area of development, agriculture and education.
- While discussing the development in North Maharashtra, many contestants mentioned the poor condition of the roads in this area. After the competition, Dadasaheb made various efforts to improve the roads and made the agitations successful.
- According to rhetoric competitors, farmers do not get guaranteed price in the market. Accordingly 'Banana Papaya Fruit Producers Gardening Farmers Association' was established. Through this organization, efforts are made to get guaranteed prices for agricultural products. Also there is an exchange of various knowledge related to agriculture.

## 6. Problems Encountered and Resources Required

Reading culture seems to have decreased in the current generation. This results in a reduced presentation of scholarly rhetoric. We are trying to inculcate good morals in the society by continuing this competition regularly. The second year of the competition would have been successful; our aim is to take the competition to the state level next year.

## 7. Notes –

**NIL**

# मा.अभिजीत दादा पाटील यांच्या जन्मदिवसानिमित्त



01 ऑक्टोबर

## उत्तर महाराष्ट्र स्तरीय

## भव्य वक्तृत्व स्पर्धा

* विषय *

1.उत्तर महाराष्ट्रातील कृषी क्षेत्र : काल आज आणि उद्या
2.अमृतमहोत्सवी वर्ष आणि उत्तर महाराष्ट्राचा विकास
3.बदलते शैक्षणिक वास्तव आणि उत्तर महाराष्ट्र

---

* स्पर्धेची बक्षिसे *

प्रथम- 5,000 रु आणि स्मृतीचिन्ह
द्वितीय- 3,000 रु आणि स्मृतीचिन्ह
तृतीय- 2,000 रु आणि स्मृतीचिन्ह
उत्तेजनार्थ- 1,000 रु दोन स्पर्धकांसाठी

---

### * आयोजक *

शहादा तालुका एज्युकेशनल सोसायटी अँड को ऑप.एज्युकेशन सोसायटी लि. संचलित,

## सिनिअर आर्ट्स महिला महाविद्यालय, शहादा

ऑनलाईन प्रवेश नोंदणी लिंक
https://forms.gle/A5whMPs5waSSXKWk7

संपर्क
प्रा.खेमराज पाटील
मो.7798602028

* स्पर्धेचे नियम

- खुल्या गटासाठी नि:शुल्क स्पर्धा.
- स्पर्धकाने आपला 5 मिनिटांचा व्हिडीओ 7798602028 या टेलिग्राम नंबरवर दि. 22/09/2022 पर्यंत पाठवावा.
- स्पर्धकाने आपल्या व्हीडीओ सोबतच स्वतःचे नाव, पत्ता आणि विषयाचे नाव पाठवणे आवश्यक आहे.
- आपण पाठवत असलेला व्हीडीओ सलग असावा. एडीट केलेला, स्टॉप करून परत चालू केलेला नसावा; तसेच इको किंवा अन्य कोणत्याही साउंड इफेक्टचा वापर केलेला नसावा.
- व्हिडीओ आणि ऑडीओची Quality चांगली असावी.
- स्पर्धकाने आपला वक्तृत्वाचा व्हिडीओ मराठी, हिंदी आणि इंग्रजी पैकी एका भाषेतून पाठवावा.
- ऑनलाइन पाठवलेल्या व्हिडीओंमधून 10 उत्कृष्ठ स्पर्धकांना शहादा येथील महाविद्यालयात 29/09/2022 रोजी ऑफलाइन वक्तृत्व सादरीकरणासाठी निमंत्रित केले जाईल.
- त्यातून सर्वोत्कृष्ठ स्पर्धकांना 03 बक्षिसे आणि 02 उत्तेजनार्थ पारितोषिके दि.01/10/2022 रोजी मा. अभिजित दादांच्या हस्ते शहादा येथे वितरीत करण्यात येतील.
- स्पर्धेतील सहभागी स्पर्धकास प्रमाणपत्र देण्यात येईल.
- परीक्षकांचा निकाल अंतिम असेल व तो सर्व स्पर्धकांना बंधनकारक राहील.
- रजिस्ट्रेशन करणे आवश्यक.

# भव्य वक्तृत्व स्पर्धा





प्रतिमापूजन आणि मार्गदर्शन करतांना मान्यवर





स्पर्धेचे परीक्षण करतांना परीक्षक

# भव्य वक्तृत्व स्पर्धा













## विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक वितरण करताना मान्यवर

जळगाव तरुण भारत

Main Edition | 2022-10-04 | Page- 2

epaper.tarunbharatjalgaon.com

भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस

# शहादा येथे उत्तर महाराष्ट्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धा



**शहादा** : तालुक्यातील युवा नेतृत्व अभिजीत पाटील यांच्या जन्मदिनानिमित्त उत्तर महाराष्ट्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यात गणेश दीपक गिरासे याने प्रथम, आदित्य अशोक बागले याने द्वितीय, अद्वैता रवींद्र पाटील याने तृतीय क्रमांक पटकाविला, तर लीना साहेबराव वसईकर व पूर्वा मधुकर पाटील यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. खा. डॉ. हीना विजयकुमार गावित यांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कार देण्यात आले.

पुरस्कार वितरण सोहळ्यात संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, अभिजीत पाटील, प्रीती पाटील आदी उपस्थित होते.गेल्या दोन वर्षांपासून 'शहादा तालुका एज्युकेशनल सोसायटी अँड को-ऑप एज्युकेशन सोसायटी लिमिटेड' संचलित सिनिअर आर्ट्स महिला महाविद्यालय, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, आय.एम. आर.डी. महाविद्यालय या तीनही वरिष्ठ महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने ह्या स्पर्धा घेतल्या जात आहेत. मागील वर्षाची स्पर्धा ही नंदुरबार जिल्ह्यापर्यंत मर्यादित होती. यावर्षी उत्तर महाराष्ट्र स्तरीय करण्यात आली.यावर्षी 'वक्तृत्व स्पर्धा' ही दोन टप्प्यात पार पडली. स्पर्धेत तीन विषयांवर स्पर्धकांना वक्तृत्व, सादरीकरण करायचे होते. त्यामध्ये, 'उत्तर महाराष्ट्रातील कृषी क्षेत्र : काल, आज आणि उद्या', 'अमृतमहोत्सवी वर्ष आणि उत्तर महाराष्ट्राचा विकास', आणि 'बदलते शैक्षणिक वास्तव आणि उत्तर महाराष्ट्र' या विषयांचा समावेश होता. पहिल्या टप्प्यात स्पर्धकांकडून उपरोक्त एका विषयावर पाच मिनिटांचा ऑनलाईन व्हिडिओ २२ सप्टेंबरपर्यंत मागवण्यात आले होते.

**Change Of Name**

My old name, **Sushma Namdev Chaudhary** is now permanently change as **Sushma Umesh Nemade**, please note it. Name **Sushma Umesh Nemade** Reidence-Bhusaval, Dist-Jalgaon

# वक्तृत्व स्पर्धेत गणेश गिरासे प्रथम

## आदित्य बागले द्वितीय, तर अद्वैता पाटील तृतीय

**सकाळ वृत्तसेवा**

शहादा, ता.५ : तालुक्यातील युवा नेतृत्व अभिजित पाटील यांचा जन्मदिनानिमित्त उत्तर महाराष्ट्र स्तरीय वक्तृत्व स्पर्धा झाली. यात गणेश गिरासे प्रथम, आदित्य बागले द्वितीय, अद्वैता पाटील याने तृतीय क्रमांक पटकावला, तर लीना वसईकर व पूर्वा पाटील यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. विजेत्यांना खासदार डॉ. हीना गावित यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, अभिजित पाटील, प्रीती पाटील आदींसह प्राचार्य व प्राध्यापक उपस्थित होते. शहादा तालुका एज्युकेशनल सोसायटी अॅन्ड को-ऑप. एज्युकेशन सोसायटी लिमिटेड संचलित सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, आयएमआरडी महाविद्यालय या तीनही वरिष्ठ महाविद्यालयांतर्फे स्पर्धा झाली. गेल्या दोन वर्षांपासून ही स्पर्धा महाविद्यालयात घेतली जात आहे. मागील वर्षाची स्पर्धा नंदुरबार जिल्ह्यापर्यंत मर्यादित होती. या वर्षी उत्तर महाराष्ट्र स्तरीय होती. या वर्षी वक्तृत्व स्पर्धा दोन टप्प्यात पार पडली. स्पर्धेत तीन विषयांवर स्पर्धकांना वक्तृत्व व सादरीकरण करायचे होते. त्यात 'उत्तर महाराष्ट्रातील कृषी क्षेत्र : काल, आज आणि उद्या', 'अमृतमहोत्सवी वर्ष आणि उत्तर महाराष्ट्राचा विकास', आणि 'बदलते शैक्षणिक वास्तव आणि उत्तर महाराष्ट्र' या विषयांचा समावेश होता. स्पर्धेत परीक्षक म्हणून प्रा. डॉ. माधव कदम, सहाय्यक प्रा. संतोष तमखाने, सहाय्यक प्रा. खेमराज पाटील यांनी काम पाहिले.



**शहादा : उत्तर महाराष्ट्र स्तरीय वक्तृत्व स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक देताना खासदार डॉ. हीना गावित, मोतीलाल पाटील, अभिजित पाटील, प्रीती पाटील आदी.**

## नंदुरबार जिल्हा केळी, पपई-फळ बागायतदार सहकारी संस्था, जि.नंदुरबार

# ॥ शेतकरी परिषद ॥

नंदुरबार जिल्ह्यातील व परिसरातील केळी, पपई व अन्य पिक उत्पादक शेतकऱ्यांना विनंती की, पपई, केळी व इतर पिकांच्या चालू हंगाम २०२२-२०२३ मध्ये आलेला अनुभव व पुढील हंगाम २०२३-२०२४ च्या बाबतीत विचार विनिमय करण्यासाठी. परिसरातील केळी व पपई उत्पादक शेतकरी यांची भव्य परिषद आयोजित केली आहे. तरी सर्व शेतकरी बांधवांना नम्र विनंती की ह्या मेळाव्यास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहुन एक जुटीचा निर्धार करू या....व उपस्थित राहूया... !

### बैठकीतील मुद्दे:

१) केळी,पपई उत्पादक शेतकरी संघटीत करणे.
२) केळी व पपई दरा संदर्भात पुढील वर्षाची भुमिका ठरविणे.
३) शेतकऱ्यांसाठी विविध शासकिय योजने बाबत जनजागृती करणे.
४) विज वितरण कंपनीशी निगडीत शेतकऱ्यांच्या समस्यांवर विचार विनिमय करणे.
५) पिक विमा योजनेत येणाऱ्या अडचणींवर चर्चा करणे.
६) रोप लागवड व तांत्रिक दृष्ट्या शेती होणेसाठी जनजागृती करणे.

**''चला संघटीत होऊ या....आपले प्रश्न आपणच सोडवुया....!''**

**दि. २० मार्च २०२३,सोमवार** — **वेळ: सायं.५ ते ९**

**स्थळ: अन्नपुर्णा माता मंदिर, प्रकाशा, ता.शहादा, जि.नंदुरबार**
(श्री केदारेश्वर मंदिरा जवळ,प्रकाशा)

टिप: कार्यक्रमानंतर स्नेह भोजनाची व्यवस्था केली आहे.

॥ आपले विनित ॥

श्री. अभिजीत मोतीलाल पाटील (अध्यक्ष)

सन्माननीय संचालक

| | | |
|---|---|---|
| श्री. पुरुषोत्तम रामदास चव्हाण,मोड | श्री. हरि दत्तु पाटील, प्रकाशा. | श्री. बुधा गोपाळ पाटील, करजकुपे |
| श्री. भगवान शंकर पाटील, जयनगर | श्री. सत्यानंद प्रकाश पाटील, शहादा | श्री. मुकेश प्रल्हाद पाटील, सारंगखेडा |
| श्री. अनिल सुभाष पाटील, सुलवाडा | श्री. संजय श्रीपत पाटील,तळोदा | डॉ.श्री. उमाकांत माधव पाटील, शिंदे |
| श्री. संजय पुना पाटील, कवठळ | डॉ.श्री.आनंद वन्सी पाटील, रायखेड | श्री. राहुल साहेबराव सनेर, कुकावल |
| श्री. अभयगिर रमेशगिर गोसावी,वडाळी | श्री. निरज सुरेश पाटील, तळवे | श्री. मोहनसिंग जयसिंग गिरासे, वर्धेटेंभे |
| श्री. दिपक नरोत्तम पाटील, तऱ्हाडी | श्री. प्रशांत शांतीलाल पटेल, नळवे | श्री. सखाराम संभू तडवी,अक्कलकुवा |
| सौ. शालिनी संजय चौधरी,समशेरपुर | सौ. रेखा योगेश पाटील, फेस | |

तसेच सर्व सभासद बांधव, हितचिंतक,
नंदुरबार जिल्हा केळी, पपई-फळ बागायतदार सहकारी संस्था, जि.नंदुरबार

भुषण ऑफसेट-९४२३९०५९७८

लोकमत

नरेंद्र जी.गुरव

# प्रकाशा येथील केळी, पपई उत्पादक परिषदेत हजारो शेतकऱ्यांची उपस्थिती

## महाराष्ट्रासह गुजरात, आंध्र प्रदेश, झारखंडमधील शेतकरी प्रतिनिधी झाले सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

**प्रकाशा** : शहादा तालुक्यातील प्रकाशा येथे सोमवारी अन्नपूर्णा माता मंदिराच्या प्रांगणामध्ये पपई, केळी उत्पादक शेतकऱ्यांची शेतकरी परिषद झाली. या परिषदेला महाराष्ट्र व गुजरातमधील हजारो केळी व पपई उत्पादक शेतकरी उपस्थित होते. रात्री उशिरापर्यंत परिषदेत शेतकऱ्यांची चर्चा सुरू होती.

नंदुरबार जिल्हा केळी व पपई परिषदेचे आयोजक अभिजित मोतीलाल पाटील यांनी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती व संघटनात्मक काम सुरू केले होते. त्याला प्रतिसाद मिळाल्याने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेला प्रमुख अतिथी म्हणून नाबार्डचे सहायक महाप्रबंधक प्रमोद पाटील, शहाद्याचे माजी अध्यक्ष मोतीलाल पाटील, कृषी विज्ञान केंद्राचे राजेंद्र दहातोंडे, तालुका कृषी अधिकारी किशोर हडपे, तानाजी नाईकनवरे, कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष कृष्णदास पाटील, भाजपचे प्रदेश सदस्य राजेंद्रकुमार गावित आदी उपस्थित होते.



प्रकाशा, ता.शहादा येथे सोमवारी पपई व केळी उत्पादक शेतकरी परिषदेत बोलताना नंदूरबार जिल्हा पपई, केळी उत्पादक, बागायतदार संघाचे अध्यक्ष अ पाटील. समोर उपस्थित शेतकरी. (छाया : नरे

दीपप्रज्वलन करून परिषदेला सुरुवात करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचा समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी नंदूरबार जिल्हा पपई, केळी उत्पादक, बागायतदार संघाचे अध्यक्ष अभिजित पाटील म्हणाले की, शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य व चांगला भाव मिळाला पाहिजे हे एकमेव उद्दिष्ट संघटनेचे असून त्यासाठी शेतकऱ्यांनी संघटित झाल्याशिवाय पर्याय नाही. बाहेरील व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक झाली तर शेतकऱ्याला संघटनेतर्फे न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न राहील. जी.आय. नामांकन मिळवून देण्यासाठी व कोल्डस्टोरेजसाठी प्रयत्न सुरू आहेत. वर्षभरात शेतकऱ्यांनी पिकाचे नियोजन करावे. शेतकऱ्यांनी भावनिक न होता व्यवहारिक झाले पाहिजे. बँकेमधील आपला स्वत:च्या सिबील स्कोर कसा वाढेल याकडे लक्ष ठेवले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

परिषदेत इतर शेतकऱ्यांनीही मनोगत व्यक्त केले. 'किसान का बेटा' या विषयावर योगेश नांद्रे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक हरी दत्तू पाटील यांनी केले. सूत्रसंचालन विष्णू जोंधळे तर आभार भगवान पाटील यांनी मानले. मेळाव्याला पुरुषोत्तम चव्हाण, भगवान पाटील, अनिल पाटील, संजय पाटील, अभयगीर गोसावी, दीपक नरोत्तम पाटील, पाटील, बुधा पाटील, मोहनसिंग गिरासे, पाटील, पाटील, सत्यानंद पाटील, पाटील, मुकेश पाटील आदींसह शेतकरी होते.

### शेतकऱ्यांचा सन्मान

या परिषदेत उत्कृष्ट उत्पादन करणारे प्रतिनिधी, उत्पादक शेतकरी यांच सत्कार करण्यात आला. त्यात ईश्वर दगा पाटील (करजकुपा), दीपक पाट (कळमसर मोहिदा), ओरसिंग पटले (वाडी पुनर्वसन), महारु पाटील (नंदुर रमाकांत पटेल (बहुरुपा), प्रकाश पाटील (वडछील), शालिकराव पाटील (होळतर्फे रनाळा), भाऊभाई पाटील (मोहिदा), पुरुषोत्तम पाटील (मोहिदा) संदीप पाटील (कलसाडी), गजेंद्र पटेल (निझर), दीपक पटेल (निझर), न चौधरी (करजकुपा), विनोद चौधरी (समशेरपूर), सुनील पाटील (बोरद), सु पाटील (तऱ्हाडी), दिलीप पाटील (भरवाडे) यांचा सत्कार झाला.

सकाळ

## अभिजित पाटील : केळी, पपई फळ बागायतदार सहकारी संस्थेतर्फे परिषद

# मानांकन मिळाल्यास एक्स्पोर्टची संधी

**▸ सकाळ वृत्तसेवा**

शहादा/प्रकाशा, ता. २० : आपल्या भागात सर्वाधिक पपईचे उत्पादन घेतले जाते. चविष्ट पपई पिकवली जाते. ती भारतात कुठेही नाही. पपई पिकाच्या फळ पिकात समावेश आहे. पपईला जीआय मानांकन मिळावे, यासाठी प्रयत्न करणार. तसेच जी आय मानांकन मिळाल्यास शेतकऱ्यांना एक्सपोर्टची संधी मिळेल, त्यातून आपोआपच शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती सुधारेल. शेतकऱ्यांनी भावनिक न होता व्यावहारिक व्हावे. शेती ही विकू नका तर राखा असे आवाहन पपई, केळी उत्पादक संस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी केले.

प्रकाशा (ता.शहादा) येथील अन्नपूर्णा माता मंदिराचा प्रांगणात नंदुरबार जिल्हा केळी, पपई फळ बागायतदार सहकारी संस्थेतर्फे शेतकरी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अध्यक्ष स्थानावरून अभिजित पाटील बोलत होते. यावेळी नाबार्डचे प्रमोद पाटील, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ राजेंद्र दहातोंडे, तालुका कृषी अधिकारी किशोर हडपे, नोनीन्यू सीड्सचे असी.मॅनेजर तानाजी नाईकनवरे, हेडगेवार सेवा समितीचे अध्यक्ष कृष्णदास पाटील, राजेंद्रकुमार गावित, भाऊ भाई पाटील, हिरालाल पाटील, पुरुषोत्तम पाटील, पितांबर माळी, बुधाभाई पाटील, राकेश सनेर, भगवान पाटील, मोहनसिंग गिरासे, विठोबा माळी, साहेबराव गोसावी आदींसह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

नाबार्डचे प्रमोद पाटील म्हणाले, देशभरात मोजक्याच संस्था फळबागायतदार संस्थेत काम करतात. कोणतेही पीक घ्या लागवडीपूर्वी नियोजन करणे गरजेचे आहे. नाबार्डचे काम, विविध शासकीय योजना, कृषी कर्ज या बाबत माहिती दिली. तालुका कृषी अधिकारी किशोर हडपे यांनी फळ पीक विम्याबाबत सविस्तर माहिती दिली. हरी पाटील यांनी प्रास्ताविक तर विष्णू जोंधळे यांनी सूत्रसंचालन केले.




प्रकाशा (ता. शहादा) : शेतकरी परिषदेत मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील. शेजारी व्यासपीठावर मान्यवर.

### परिषदेतील ठळक बाबी

- मातीचे आरोग्य, केळी, पपई पिकावरील विविध आजार, त्यावरील उपाय, कमी खर्चात अधिकाधिक गुणवत्ता पूर्ण उत्पादन घेण्याबाबतचा टिप्स देण्यात आल्या.
- पपई व केळीचे पूजन करून परिषदेचे उद्घाटन
- शेतकऱ्यांना शेती कसतांना येणाऱ्या विविध अडचणी,समस्यांवर ऊहापोह व मार्गदर्शन करण्यात आले.
- परिषदेत मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र या तिन्ही राज्यातून हजारो शेतकऱ्यांची उपस्थिती.
- उत्कृष्ट उत्पादन घेणाऱ्या केळी, पपई उत्पादक शेतकऱ्यांचा संस्थेतर्फे सत्कार.
- नेहमी मदत करणाऱ्या शेतकऱ्यांचा संस्थेतर्फे सामुहिक सत्कार.

### परिषदेत झालेले विविध ठराव

परिषदेत शेतकऱ्यांनी सांगितलेल्या समस्या सर्वांसमोर मांडण्यात आल्या. त्यावर प्रश्नोत्तराच्या रूपाने विविध ठराव करण्यात आले. त्यात पपई खरीददार व्यापाऱ्यांचे पोलिस व्हेरिफिकेशन व्हावे., ज्या व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांचे पैसे बुडविले आहेत त्यांची नावे जाहीर करावी, पपई कटिंग वेळी अतिरिक्त खर्च, केळीचा पत्ती, दांडा आदी पपईच्या ऍडव्हान्स घ्यावा आदींसह विविध शेतकऱ्यांच्या प्रश्नावर ठराव करण्यात आले. शेतकऱ्यांनी हात उंचावून प्रत्येक प्रश्न तथा ठरावाला होकार दिला.


Dhule, Dhule-Main
21/03/2023 Page No. 3




नांदरखेडा (ता. शहादा) : 'अॅग्रोवन'मध्ये प्रसिद्ध झालेल्या वनश्री शेतकरी उत्पादक कंपनीचा अंकाचे प्रकाशन करताना पदाधिकारी.

# शेती व्यवसायाला दुय्यम दर्जा देऊ नका

## अभिजित पाटील : कापूस पिकाविषयी शेती कार्यशाळा

**▸ सकाळ वृत्तसेवा**

शहादा, ता. १ : शेती हा शाश्वत व्यवसाय आहे. शेतकऱ्यांनी जागृत होऊन शेती करावी. अर्थकारणाचे नियोजन करावे. शेती व्यवसायाला दुय्यम दर्जा देऊ नका. शेती हा उत्तम व्यवसाय आहे. उत्पादित माल विकताना टप्प्याटप्प्याने विका असे सांगत सकाळ समूहाचे 'अॅग्रोवन' हे शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक आहे. नियमित 'अॅग्रोवन' वाचल्याने शेती कसण्याची कार्यपद्धती तसेच, बाजार भाव याची माहिती मिळत असते. राज्यातील अनेक शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होण्यामागे 'अॅग्रोवन' मार्गदर्शक ठरला आहे. प्रत्येक शेतकऱ्याने अॅग्रोवनचे नियमित वाचन करावे असे आवाहन वनश्री शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी केले.

नांदरखेडा (ता. शहादा) येथे वनश्री शेतकरी उत्पादक कंपनीत स्मार्ट प्रकल्पातंर्गत मूल्य साखळी विकास शेतीशाळा कार्यक्रमांतर्गत कृषी दिनी कापूस पिकाविषयी शेती कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी एमसीडीसी पुणे येथील व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आकरे, स्मार्ट प्रकल्प नंदुरबारचे नोडल ऑफिसर प्रदीप लाटे, आत्मा योजनेचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक रवींद्र बच्छाव, नामदेव चव्हाण, वनश्रीचे संचालक यशवंत पटेल, दगडू पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शिवाजी पाटील, प्रीती पाटील आदींसह शेतकरी उपस्थित होते. आत्मा योजनेचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक रवींद्र बच्छाव यांनी कापूस पिकाबाबत लागवड, तण नियंत्रण, काढणी, काढनी पश्चात विक्री याबाबत माहिती देऊन शेती शाळेच्या उद्देश व शेतीशाळा अंमलबजावणी बाबत माहिती दिली. प्रदीप लाटे यांनी शेतकऱ्यांच्या प्रमुख उत्पादनाचे साधने याबाबत माहिती दिली. मिलिंद आकडे म्हणाले, की राज्यात कृषी उत्पादक कंपन्या भरपूर आहेत परंतु, त्यांचे बंद पडण्याचे प्रमाणही अधिक आहे. शेतकऱ्यांना आर्थिक लुटीतून मुक्त करण्यासाठी कंपन्यांची स्थापना झाली आहे. कंपन्यांनी आपला व्यवसाय आराखडा तयार करणे गरजेचे आहे. यावेळी व्यवस्थापक जयेश पाटील, योगेश नांद्रे, सचिन पाटील, मोहन पाटील, सतीश पाटील, हिमांशू पाटील, बळिराम पाटील, दीपक पाटील, सचिन चौधरी, निखिल माळी, कौशल चौधरी आदींनी कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

सकाळ

# सारंगखेडा-शहादा-शिरपूर रस्त्याची दुरवस्था

## अभिजित पाटील : रस्त्यासाठी आंदोलन करणार

**सकाळ वृत्तसेवा**

शहादा, ता. १ : सारंगखेडा ते शहादा व शहादा ते शिरपूर रस्त्याची झालेली दुरवस्था व अधिकाऱ्यांनी केलेले दुर्लक्ष बघता विविध संघटना राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. मात्र जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती अभिजित पाटील यांनी सहा महिन्यांपूर्वी या रस्त्याच्या संदर्भात आंदोलन केले होते. आताही रस्ता दुरुस्तीसाठी पुन्हा आंदोलन उभारण्याचा पवित्रा त्यांनी घेतला आहे.

शहादा ते सारंगखेडा १६ किलोमीटर अंतराचा हा रस्ता पूर्णतः खराब झालेला आहे. तसेच, अनरद बारी ते तोरखेडा या रस्त्यावर सर्वत्र मोठ मोठे खड्डे पडले आहेत. वाहनधारकांना वाहने चालवणे कठीण झालेले आहे. अनेक जण जायबंदी झाले आहे. वाहने नादुरुस्त होतात. शेतकरी देखील हैराण झाले आहेत. साखर कारखान्यांचे गळीत हंगाम सुरू होत आहेत. त्यामुळे या रस्त्याने व शिरपूर शहादा रस्त्याने उसाने भरलेल्या वाहनधारकांना त्रास होणार आहे. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता बघता शेतकरी संतप्त झालेले आहेत. भाजपच्या कार्यकर्त्यांनी आधीच आंदोलनाच्या इशारा दिला आहे. सहा महिन्याआधी धुळे येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रस्ता दुरुस्त करण्याचे आश्वासन दिले असल्याचे पत्रात नमूद केले.



**"शहादा ते सारंगखेडा हा रस्ता जिव्हाळ्याचा प्रश्न ठरला आहे. सर्वसामान्य नागरिक वाहनधारक शेतकरी व व्यापारी वर्गांसाठी आपण पुन्हा रस्त्यावर उतरणार आहोत. रस्त्याच्या कामाच्या संदर्भात नागरिकांना सोबत घेऊन आंदोलनासाठी रस्त्यावर उतरू. नागरिकांच्या संयम आता सुटला आहे.**
**-अभिजित पाटील**

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे रास्ता रोको आंदोलनाचा इशारा

शहादा, ता. १ : राष्ट्रीय महामार्ग शहादा- शिरपूर व शहादा- दोंडाईचा रस्त्यावर मोठ मोठ्या खड्ड्यांचे साम्राज्य पसरल्या मुळे दररोज जीवघेणा प्रवास करावा लागतो,खराब रस्त्यामुळे दररोज लहान मोठे अपघात होत आहेत. येत्या दोन दिवसात तत्काळ रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी अन्यथा दोंडाईचा रस्त्यावरील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ गुरुवारी (ता.३) ला रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. तहसीलदार डॉ. मिलिंद कुलकर्णी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे, शहादा दोंडाईचा व शहादा शिरपूर रस्त्याची सार्वजनिक बांधकाम विभाग शहाद्याच्या हद्दीत दयनीय अवस्था झाली आहे. अनेकांना या रस्त्याने जायबंदी केले आहे. गेल्यावर्षी ऊस वाहतुकीला प्रचंड अडचणी आल्या. अनेक वाहनांचे नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या मालाचे ही नुकसान झाले. याकडे तालुक्याचे व जिल्ह्याचा लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष आहे. यंदाही ऊस उत्पादक शेतकऱ्यांची तीच फरफट होणार आहे. यासाठी दोन दिवसात रस्ता दुरुस्तीचे आदेश देण्यात यावे. गुरुवारी होणाऱ्या आंदोलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवावा असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष गणेश पाटील, जिल्हाध्यक्ष नथू पाटील, पवन पाटील, वसंत पाटील, रवींद्र पाटील, सचिन पाटील, योगेश पाटील, रत्नदीप पाटील ,ईश्वर पाटील ,रमेश पाटील, राकेश पाटील आदींनी केले आहे.

Dhule, Dhule-Today
02/11/2022 Page No. 2

सकाळ

# शहादा फर्स्ट ग्रुपतर्फे स्वच्छता मोहीम

## बाजार समितीच्या आवारात केली साफसफाई

**सकाळ वृत्तसेवा**

शहादा, ता. २ : जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या येथील शहादा फर्स्ट ग्रुपतर्फे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. ग्रुपच्या सर्व सदस्यांनी या मोहिमेत श्रमदान केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

बाजार समिती आवारात अनेक वर्षांपासून केरकचरा साचलेला होता. त्यामुळे घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले होते. कानाकोपऱ्यात प्लास्टिकच्या पिशव्यांचे ढिगारे पडलेले होते. नगरपालिकेसह कोणीही आवारातील साफसफाईकडे कधीच लक्ष दिलेले नव्हते. पुरुषोत्तम मार्केटला लागूनच प्रवेशद्वाराच्या कोपऱ्यावर प्लास्टिक पिशव्यांच्या खच, पाचोळा व केर कचऱ्याच्या मोठा ढिगारा होता. त्यामुळे सातत्याने दुर्गंधी पसरत होती. हा ढिगारा पूर्णतः साफ करण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. विशेष म्हणजे या साफसफाई मोहिमेत शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी देखील योगदान दिले.



शहादा : कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात साफ-सफाई करताना शहादा फर्स्टचे सदस्य.

### प्रथमच साफसफाई

दरम्यान, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात साफसफाई करण्यात आली. नवनिर्वाचित सभापती अभिजीत पाटील यांनी आपल्या कार्यास स्वच्छता मोहीमेतूनच सुरवात केली. त्यांच्यासह अन्य संचालक, शहादा फर्स्ट ग्रुपचे सर्व सदस्य, तसेच साधारणत: ४० ते ५० नागरिकांनी मोहिमेत सहभाग घेतला. नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाचेही त्यांना सहकार्य लाभले. चार ते पाच ट्रॅक्टर ट्रॉली भरून केरकचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. बाजार समिती आवारातील मुख्य रस्ते, मोकळ्या जागेत साचलेला केरकचरा, वाढलेली काटेरी झुडपे तोडण्यात आली. प्रत्येक कानाकोपऱ्यात सदस्यांनी स्वच्छता केली. त्यासाठी जेसीबी यंत्राची मदत घेण्यात आली. बाजार समितीचे संचालक मोहनसिंग गिरासे, जगदीश पाटील, शिवाजी पाटील, रवींद्र पाटील, कपिल पाटील, सत्यानंद पाटील, माधव पाटील यांच्यासह ॲड. सरजू चव्हाण, नागिन पाटील, नरेंद्र पाटील, समितीचे सचिव हेमंत चौधरी, पिनाकिन पटेल, उमेश पाटील, किरण सोनवणे आदींनी ही मोहिम राबविली. दरम्यान, पुरुषोत्तम मार्केटला लागून असलेल्या गटारीचे स्लॅब पूर्णपणे तुटलेले असून, सभापतींनी नगरपालिकेच्या सहकार्याने ते दुरुस्त करण्यासाठी पाठपुरावा करावा, अशी मागणी होत आहे.

"शहादा फर्स्ट हा ग्रुप सामाजिक हित जोपासणारा आहे. शहरात विविध सामाजिक उपक्रमात सदस्य सातत्याने सहभागी असतात. स्वच्छतेवर अधिक भर दिला जातो. बाजार समिती आवारात मोठ्या प्रमाणात केरकचरा साचलेला होता. नागरिकांना, व्यापारी व शेतकऱ्यांना त्याचा त्रास होत होता. त्यामुळे हा कौतुकास्पद उपक्रम राबविला. भविष्यात सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

**-अभिजीत पाटील,** सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, शहादा

Dhule, Nandurbar-Today
03/06/2023 Page No. 4

# रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ५ ऑक्टोबरला आंदोलन होणारच

## आतापर्यंत केवळ आश्वासनेच मिळाली : अभिजीत पाटील

■ शहादा । दि.२५। ता.प्र.

शहादा तालुक्यातील प्रमुख रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी गेल्या तीन वर्षांपासून आंदोलनांच्या माध्यमातून लढा सुरू आहे. आंदोलन एका राजीतून उभे राहिले नसून सतत तीन वर्षांपासून लढा सुरू आहे. आंदोलन करणारे विरोधक नसून सर्वसामान्य नागरिक आहेत. रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत आजपर्यंत राज्यकर्त्यांना जाग आली नाही. दुर्दैवाने सारंगखेडा येथील पुलाला पडलेल्या भगदाडानंतर राज्यकर्त्यांना जाग आली आहे. ते विरोधकांना कुरघोडी करण्यासाठी वक्तव्य करत असले तरी आम्ही रस्त्यांच्या आंदोलनावर ठाम असून येत्या पाच ऑक्टोबरला नियोजित स्थळी नागरिकांना सोबत घेऊन आंदोलन होणार म्हणजे होणारच असे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अभिजीत पाटील यांनी स्पष्ट केले.

तालुक्यातील शहादा शिरपूर, शहादा सारंगखेडा व शहादा अक्कलकुवा या प्रमुख रस्त्यांची पूर्णत वाताहत झाली आहे. या रस्त्यावर होणाऱ्या अपघातामुळे अनेक जण जायबंदी झाले तर काही जिवानिशी गेले. रस्ता दुरुस्त होऊन सर्वसामान्य नागरिकांचा हाल अपेष्टा दूर व्हाव्यात यासाठी गेल्या तीन वर्षांपासून शेतकरी संघर्ष समिती, विविध राजकीय पक्ष, संघटना, सर्वसामान्य नागरिक रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहेत. परंतु आज पर्यंत प्रशासनाने केवळ आश्वासने देण्यापलीकडे कोणतीही ठोस कृती करण्यात आली नसल्याने रस्त्यांच्या दुरुस्ती साठी सर्वसामान्य नागरिक पाच ऑक्टोबरला होणाऱ्या तीव्र स्वरूपाच्या आंदोलनावर ठाम आहेत. या रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे आजपर्यंत शेतकरी, शेतमजूर, व्यावसायिक, प्रवासी यांना अनेक सर्व सामान्य नागरिकांना मोठे आर्थिक नुकसान व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. याचा थोडा देखील अंदाज राज्यकर्त्यांना येत नसल्याने त्यांच्याकडून आंदोलनाबाबत वेगवेगळे वक्तव्य येत असल्याच्या टीका आंदोलकांमार्फत लगावल्या जातोय.

> तालुक्यातील प्रमुख रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. गेल्या तीन वर्षांपासून विविध राजकीय पक्ष, संघटना, सर्वसामान्य नागरिकांना सोबत घेऊन रस्त्यासाठी आंदोलने करीत आहोत.
>
> 
>
> असेच प्रश्न वारंवार रस्त्यावर उतरून सोडवावे लागत आहे हे मोठे दुर्दैव आहे. आम्ही सर्वसामान्य नागरिकांचा जिव्हाळ्याचा प्रश्न सुटावा यासाठी लढत असून राज्यकर्ते मात्र यावरून श्रेय घेण्याच्या प्रकार म्हणत असतील तर त्यांचे हे वक्तव्य अत्यंत चुकीचे व दुर्दैवी आहे. रस्त्यांची झालेली वाताहत पाहता आंदोलनावर ठाम असून आंदोलन होणारच
>
> **- अभिजित पाटील**
>
> (सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, शहादा)

### श्रेय घेण्याचे वक्तव्य दुर्दैवी व चुकीचे...

आंदोलनाबाबत अभिजीत पाटील म्हणाले की, विविध राजकीय पक्ष, संघटना सर्वसामान्य नागरिक यांना सोबत घेऊन रस्त्यांसाठी तीन वर्षांपासून लढा सुरू आहे. हे आंदोलन एका रात्रीतून उभे राहिले नसून गेल्या तीन वर्षांपासून सतत लढा सुरू आहे. आजपर्यंत झालेल्या आंदोलनाची दखल स्थानिक आमदार, खासदारांनी घेतली नाही. उलट यश आंदोलनाबाबत त्यांनी केलेले वक्तव्य अत्यंत चुकीचे व दुर्दैवी आहे. विरोध म्हणजे आंदोलन करणारे हे विरोधक नसून सर्वसामान्य नागरिक आहे. राज्यकर्त्यांनी वेळीच लक्ष दिले असते तर आज ही वेळ सर्वसामान्य नागरिकांवर आली नसती. आज पर्यंत कुठल्याही लोकप्रतिनिधींनी रस्त्यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले नसल्याने आता अधिकाऱ्यांशीच बोलणे केले जाईल. कोणी कितीही वक्तव्य केले तरी आम्ही आंदोलनावर ठाम असून नियोजित स्थळी व नियोजित वेळी आंदोलन होणारच असल्याची ग्वाही श्री पाटील यांनी दिली.

### स्थानिक राज्यकर्ते अनभिज्ञ ??

दरम्यान, गेल्या तीन वर्षांपासून या प्रमुख रस्त्यांची झालेली वाताहत पाहता आजपर्यंत स्थानिक राज्यकर्त्यांना कुठलेही सोयर सुतक नसल्याचेही सर्वसामान्य नागरिकांमध्ये चर्चिले जात आहे. रस्त्यांची वाताहत झाल्यामुळे गेल्यावर्षी शेतकऱ्यांच्या ऊस कारखान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. त्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचेही बोलले जात आहे. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, वाहनधारक सोबत या रस्त्याने बेजार झाले आहेत. त्याचबरोबर सारंगखेडा येथील पुलाला पडलेल्या भगदाडा नंतर वाहतूक बंद करण्यात आली. या घटनेला आठवडा होत आला परंतु साधी भेट ही स्थानिक राज्यकर्त्यांनी दिली नाही. या घटनांबाबत अद्यापही स्थानिक राज्यकर्ते अनभिज्ञ आहेत का असा खोचक सवाल सर्वसामान्य नागरिकांमधून सोशल मीडियातून अनेक वेळा व्यक्त होत आहे.

# Best Practices

## 2022-23

## Best Practice – 2

### 1. Title Of The Practice – Medical Checkup Camp

### 2. Objectives of the practice –

- Providing free health check-ups to the students in the college.
- To create awareness among the students regarding health and hygiene.
- To take care of the health of the students admitted in the college.
- Conducting lectures on health to create health awareness among students.

### 3. The Context –

Our college is located in a semi-urban area; The number of students admitted in the college is more from rural areas. No one goes to the doctor until a part hurts. At that time, as our responsibility, we organized a health checkup camp on the occasion of World AIDS Day in the college. So that the students know if they have any health problems

### 4. The Practice -

On the occasion of World AIDS Day, a lecture and health check-up camp was organized in the college on 02 December 2022 under the chairmanship of Vanshree Tatyasaheb Motilal Patil, chairman of the Institute. For the lecture Mr. Jitendra Naiday was present. Dr. Monali Patil, Mrs. Naina Dhonde, Mrs. Akshata Ahire were also present for the health checkup camp.

Shri Jitendra Naide gave information about AIDS disease, how does the disease occur? What are the solutions? A detailed discussion was held with the students about this. After that The president of the program guided the students through a speech. After the lecture, the students were tested for CBC, HB, HIV, and Sickle Cell by a panel of expert doctors. Students enthusiastically participated in the health check-up camp.

## 5. Evidence of Success –

- A total of 115 students took four types of tests free of cost in the college.
- There are many misconceptions about AIDS at a young age. We managed to pull it off.
- Four tests were made available at one place in the college to poor students in rural areas; So that they should be vigilant about health,
- In Nandurbar district many women die due to sickle cell. At that time, we tested the sickle cell students by telling them about the symptoms of this disease.

## 6. Problems Encountered and Resources Required –

Young girls often do not come forward to be tested for AIDS, sickle cell; but we removed their ignorance and encouraged them to get tested for AIDS and sickle cell.

## 7. Notes –

**NIL**

S.T.E.S.& CO-OP EDU.SOC.LTD'S

S.N.D.T. महिला विद्यापीठ,मुंबई संलग्नित,

# सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा

## एन.एस.एस.एकक

दिनांक : 02 /12/2022

वार : शुक्रवार

# जागतिक एड्स दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबीर

**आरोग्य तपासणी : CBC/HB/HIV/ शिकलसेल**

**वेळ / स्थळ :** सकाळी 9 वाजता, / 001 क्लासरूम.

## विद्यार्थिनींसाठी सूचनाः

१. FYBA/BCA एन एस एस स्वयंसेवक विद्यार्थिनी यांना ही तपासणी करणे अनिवार्य आहे . तपासणी मोफत ( FREE OF COST)आहे.

२. FYBA/BCA ज्या विद्यार्थिनींनी वरिल तपासणीसाठी उपस्थित नसणार त्यांनी नंतर स्वखर्चाने तपासणी करून महाविद्यालयात रिपोर्ट जमा करावे.

३. तपासणी दिनांक 02/12/2022 वार शुक्रवार रोजी आयोजित केली आहे.

एन.एस.एस. एकक

सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा

प्राचार्य

प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ. कैलास चव्हाण

सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा

S.T.E.S.& CO-OP EDU.SOC.LTD'S

S.N.D.T. महिला विद्यापीठ,मुंबई संलग्नित,

# सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा

## एन.एस.एस.एकक

दिनांक : 02 /12/2022

वार : शुक्रवार

# जागतिक एड्स दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबीर

**आरोग्य तपासणी : CBC/HB/HIV/ शिकलसेल**

**कार्यक्रमाचे अध्यक्ष :**

मा. वनश्री मोतीलाल फकिरा पाटील

चेअरमन

श.ता.एज्यू.सो. आणि को - ऑप एज्यू.सो.लिमिटेड.

**मार्गदर्शक:**

मा. श्री. जितेंद्र नायडे

ग्रामीण रुग्णालय शहादा .

**आयोजक**

एन.एस.एस. एकक

सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा

**प्राचार्य**

प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ. कैलास चव्हाण

सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा

S.T.E.S.& CO-OP EDU.SOC.LTD'S

S.N.D.T. महिला विद्यापीठ,मुंबई संलग्नित,

# सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालय, शहादा

## एन.एस.एस.एकक

दिनांक : 02 /12/2022

वार : शुक्रवार

## जागतिक एड्स दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबीर

आरोग्य तपासणी : CBC/HB/HIV/ शिकलसेल



कार्यक्रमास उपस्थित संस्थेचे अध्यक्ष मा. वनश्री तात्यासाहेब मोतीलाल पाटील





कार्यक्रमास उपस्थित संस्थेचे अध्यक्ष मा. वनश्री तात्यासाहेब मोतीलाल पाटील अतिथी डॉ. जितेंद्र नायडे यांचे स्वागत करताना


GPS Map Camera
Shahada, महाराष्ट्र, भारत
GFQC+Q79, तुलसी नगर, स्वामी विवेकानंद नगर, कल्सदी, महाराष्ट्र 425409, भारत
Lat 21.539231°
Long 74.471056°
02/12/22 12:43 PM GMT +05:30
Google



लोकमत

# महिला महाविद्यालयात आरोग्य शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

शहादा : शहरातील एस.एन.डी.टी. सिनिअर आर्टस् महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककाकडून 'आरोग्य तपासणी शिबिर' घेण्यात आले.

अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. संदीप मराठे व आय.एम.आर.डी.चे संचालक प्रा. अनिल पाटील, धुळे-नंदुरबार जिल्ह्याचे राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक प्रा. काकासाहेब अनपट उपस्थित होते.

शिबिरात मार्गदर्शक म्हणून जितेंद्र नायडे उपस्थित होते. यावेळी मोनाली पाटील, नैना धोंडे, अक्षता अहिरे यांनीही मनोगत व्यक्त केले. जितेंद्र नायडे सर यांनी विद्यार्थिनींना एड्सची कारणे, एड्स कसा पसरतो, एड्स आणि HIV तील फरक याविषयी मार्गदर्शन केले.

शिबिरात विद्यार्थिनींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यात सी.बी.सी., एच.बी., एच.आय.व्ही. आणि सिकल सेल इ. तपासण्या करण्यात आल्या. तपासणीत बी.ए. व बी.सी.ए.च्या विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. सूत्रसंचालन प्रा. रेणुका पाटील यांनी केले. प्रास्ताविक एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. योगेश भुसारे यांनी केले. आभार प्रा. मंगला पाटील यांनी मानले. याप्रसंगी